भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/८१
डीजीबीए. सीडीडी. क्र. ७९२१/१३.०१.२९९/२०१३-१४ जुलै ०१, २०१३

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
मुख्य कार्यालय (सरकारी लेखा विभाग),
भारतीय स्टेट बँक व सहकारी बँका,
सर्व राष्ट्रीयीकृत बँका (पंजाब अँड सिंध बँक व आंध्र बँक सोडून),
ॲक्सिस बँक लि./एचडीएफसी बँक लि./
स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसचसीआयएल)

महोदय/महोदया,

**ब्रोकर्सची नेमणूक व यादीतून काढून टाकणे आणि**
**रिलीफ/बचत रोख्यांचे प्रदान ह्यावरील महापरिपत्रक**

कृपया वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक क्र. डीजीबीए.सीडीडी.क्र.एच ८५७६/१३.०१.२९९/२०१२-१३ दि. जुलै ०२, २०१२ चा संदर्भ घ्यावा.

२) वरील विषयावरील सर्व कार्यकारी सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, जून ३०, २०१३ पर्यंत दिल्या गेलेल्या सूचनांचे एकत्रीकरण केलेले महापरिपत्रक सोबत जोडले आहे आणि ते आरबीआयच्या वेबसाईटवरही http://www.rbi.org.in टाकण्यात आले आहे

आपली विश्वासु

(संगिता लालवाणी)
महा व्यवस्थापक

सोबत - एक पान जोडले आहे.

सरकारी आणि बँक लेखा विभाग, केंद्रीय कार्यालय, ४था मजला, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा मुंबई-४०० ००८,
टेलि-(०२२) २३०८ ४१२१,; फॅक्स क्र. (०२२) २३०० ०३७०/२३०१ ६०७२/२३०१ ००९५.
ईमेल : cgmicdgbaco@rbi.org.in

सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.

## ब्रोकर्सची नेमणूक व यादीतून काढून टाकणे आणि रिलीफ/बचत रोख्यांचे प्रदान ह्यावरील महापरिपत्रक

### अ) ब्रोकर्सची नेमणुक/यादीतून काढून टाकणे

### १) ब्रोकर्सच्या नावनोंदणी/पंजीकरणाची कार्यरीत

ब्रोकर्सची नोंदणी/पंजीकरण करण्यासाठी एजन्सी बँका एक साधी कार्यरीत अंगीकारु शकतात. नोंदणी/पंजीकरण करण्यास इच्छुक असलेल्या ब्रोकरने त्याची/तिची नोंदणी/पंजीकरणाची विनंती, त्याच्या/तिच्या व्यावसायिक लेटरहेडवर, त्याच्या व्यवसायिक माहितीसह सादर करावी. एजन्सी बँकांनी एक ब्रोकर कोड नंबर द्यावा आणि रिसीव्हींग ऑफिसेसमध्ये सादर करावयाच्या सर्व अर्जांवर ब्रोकरने त्याचा निर्देश करावा.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२०१/६९२/२०००-०१ दि, ९.८.२०००)**

### २) एजन्सी बँकांद्वारे उप-एजंटांची नेमणुक

आमच्या नजरेस असे आले आहे की, आरबीआयकडून नेमलेल्या/प्राधिकृत केलेल्या काही बँकांनी, अर्ज स्वीकारण्यासाठी इतर बँकांची ब्रोकर्स/एजंट्स म्हणून नेमणुक केली असून ते ब्रोकर/एजंट्स, त्यांच्या प्रसिध्दी. साहित्यामध्ये आणि बिल बोर्डांवर रिझर्व बँकेचे नावाचा उपयोग करुन, रिलिफ/बचत रोख्यांच्या व्यवसारासाठी रिझर्व बँकेने त्यांना नेमले आहे असे त्यावर दाखवीत आहेत. येथे आम्ही स्पष्ट करीत आहोत की, जेथे प्राधिकृत बँकांनी ब्रोकर किंवा एजंट म्हणून इतर बँका/संस्थांच्या सेवा घेतल्या आहेत तेथे, त्यांची नेमणूक करणाऱ्या एजन्सी बँका ह्याच त्या एजंट/ब्रोकर्सच्या कार्यकृतींबाबत जबाबदार राहतील अशा कोणत्याही बँकेने आरबीआयचे नाव वापरु नये. **(संदर्भ. क्र.सीओ.डीटी.१३.०१..२५१/५३४१/२००१-०२ दि. ४-१-२००२)**

### ३) ब्रोकर्सना यादीतून काढून टाकणे

एजन्सी बँकांना सांगण्यात येते की, दोन वर्षे पर्यंत काहीही कामगिरी न करणाऱ्या ब्रोकर्सना त्यांच्याकडून नवीन धंदा न मिळाल्यास एक नोटिस देऊन त्यांचे नाव यादीतून काढून टाकण्यात यावे.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२०१/४८९०/१९९९-०० दि, ६.३.२०००.)**

### ब) बचत रोख्यांसाठी प्रदान व दलालीचे दर

### १) दलालीचे दर

अ)एजन्सी बँकांकडे नोंदणी/पंजीकरण केलेल्या ब्रोकर्सना, फॉर्म बाँड लेजर अकाऊंट (बीएलए) मध्ये, नेमलेल्या शाखांमध्ये, त्यांच्या ग्राहकांच्या वतीने गुंतवणुकीसाठी त्यांचा शिक्का असलेले अर्ज सादर केले जाण्यावर रु.१.०० (रुपया एक) प्रति रु.१००/- ह्या दराने दलाली देण्यात यावी. **(संदर्भ क्र. सीओ.डीटी. १३.०१.२०१/४३२/ २०००-०१ दि,२५-७-२०००) आणि जीओआय अधिसुचना क्र.एफ.४(१- ड्ब्ल्यु आणि एम/९९ दि.२१.७.२०००)**

ब)तो ब्रोकर्स गुंतवणुकदार/अर्जदार ह्यांचेपैकी एक असल्यास दलाली दिली जाऊ नये

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी. १३.०१.२९८/एच २४११/०३-०४ दि. २९-१०-२००३)**

### २) दलाली प्रदानावर टीडीएस नाही -

(२) आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम १९४(एच) अन्वये, ब्रोकर्सद्वारा प्रचारित केल्या गेलेल्या रिलीफ/बचत बॉड्सच्या व्यवहारासंबंधाने दलाली देते वेळी, एजन्सी बँकांद्वारे टीडीएस कापण्याची आवश्यकता नाही.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी. २०१/५९००/२०००-०१ दि. २८-५-२००१ आणि सीओ.डीटी. १३.०१.२९८/एच-३६६०/०३-०४ दि.३-१-०४)**

**३) दलालीसंबंधीचे दावे**

अ) दलालीसंबंधीचे दावे तातडीने व कोणत्याही बाबतीत सबस्क्रिप्शनच्या तारखेच्या ३० दिवसांच्या आत सोडविण्यासाठी एजन्सी बँकांना सांगण्यात येत आहे.

(ब) आधी दलालीसंबंधीचे दावे तडजोड करुन त्यानंतर त्याची भरपाई आरबीआयकडून घेण्यास एजन्सी बँकांना सांगण्यात येत आहे.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी./१३.०१.२०१/४६६८/२०००-०१ दि.८-३-२००१)**

क) ग्राहक सेवा सुधारण्याचा एक उपाय म्हणून, एजन्सी बँकांनी, एजंटांकडून तसे मँडेट घेऊन, त्यांना द्यावयाची दलाली, दरमहा, ईसीएसद्वारा त्यांच्या खात्यात जमा करण्याची व्यवस्था करावी.

**(संदर्भ क्र. सीओ.डीटी.१३.०१.२९८/ एच -४६७७/२००२-०३ दि. २३-५-२००३)**

ड) जुलै ०१, २००२ पासून बचत रोख्यांच्या बाबतीत असलेल्या दलालीबाबतच्या दाव्यांची प्रतिपूर्ती करणे सीएएस नागपूर येथे केंद्रीकृत करण्यात आले आहे. आणि ठरविण्यात आले आहे की, व्यवसायाच्या महिन्याच्या अखेरीस, सीएएसला कळविलेल्या/पाठविलेल्या/प्रेषण केलेल्या निधीच्या आधारावर, एजन्सी बँकांना देय असलेल्या दलालीच्या ९०% रक्कम, पुढील महिन्याच्या तिसऱ्या कामकाजाच्या दिवशी प्रदान केली जाईल. आणि उरलेली १०% रक्कम जोडपत्रे ४ मधील विवरणपत्र सादर केल्यावर प्रदान केली जाईल.

**(संदर्भ -सीओ.डीटी.१३.०१.२७२/११०३२/२००१-०२ दि.२५.६.२००२ आणि सीओ.डीटी.१३.०१.२७२.एच २९०६ दि २६.२.२००३)**

*(काही विशिष्ट बाबींवर सविस्तर स्पष्टीकरण पाहिजे असल्यास कृपया वर निर्दिष्ट केलेल्या परिपत्रकांचा संदर्भ घ्यावा.)*